# एका गरीब विधवेने प्रभुला तिचे सर्व काही दिले

**प्रार्थना.** ''हे पित्या, मुलांनी आनंदाने इतरांना द्यावे याकरीता त्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून कृपा करुन ह्या अभ्यासाचा उपयोग करुन घे.''



पुढे मुलांनी करावयाच्या कृती दिल्या आहेत, त्यातून कृती निवडा

**लूक 21:1-4** ह्या शास्त्रभागातून गरीब विधवेची गोष्ट वाचा किंवा सांगा.

गोष्ट सांगण्यास सुरुवात करण्यापूर्वी, मुलांना गोष्ट काळजीपूर्वक ऐकण्यास सांगा. तसेच देवाला कोणत्या प्रकारे दिलेले दान आवडते ते ओळखवयास सांगा गोष्ट सांगून झाल्यावर, विचारा:

- गरीब विधवेने दानपेटीमध्ये काय टाकले?
- गरीब विधवेने तिच्याकडे होते त्यातून किती दानपेटीत टाकले?
- विधवेच्या दाना विषयी येशूने काय सांगितले?
- देवाला दान देताना श्रीमंत लोक खूप त्याग करतात का?
- देवाच्या दृष्टीने अधिक दान कोणी दिले, त्या स्त्रीने की श्रीमंत लोकांनी?

रोमन काळातील दोन जुनी नाणी किंवा नाणी असलेली पेटी, विधवा स्त्री अथवा श्रीमंत लोक यांची चित्रे काढा. चित्रे काढव्यासाठी मोठया मुलांनी लहान मुलांना मदत करावी.



- अम्ही देवाला कशा प्रकारे दिले पाहिजे हे चित्रावरुन समजते याचे स्पष्टीकरण करुन सांगा.
- मुलांना चित्र कागदावर उतरवून घेऊ द्यात किंवा त्यांचे त्यांना चित्र काढू द्या.
- अकोणी द्यायला लावले म्हणून नाही तर त्या विधवेने दिले तसे संतोषाने आनंदाने आणि उदारपणे अंत:करणपूर्वक आम्ही दिले पाहिजे हे स्पष्ट करून सांगा.
- मुलांना त्यांनी काढलेले चित्र मोठया लोकांना समजून सांगण्याची संधी पुढच्या उपासनेच्या वेळी द्या.

शास्ते 19:14-21 ह्या शास्त्रपाठातून गिबा येथील उदारमणाच्या म्हाताऱ्या माणसाची गोष्ट सांगा किंवा वाचून दाखवा.

- मोठया मुलांना यातील पुढील भूमिका करु द्या.

  **निवेदक गोष्ट** वाचून दाखवा आणि काय बोलायचे ते इतर मुलांना समजावून सांगा

  **म्हातारा**

  **लेवी माणूस**

  लहान मुलांना यातील पूढील भूमिका करु द्या

  **नोकर**

  **नोकराणी**

  **गाढवे** दोन्ही हात व पाय (किंवा गुडघे) ह्यांवर गाढवांसारखे चाला गिबोनी.

  **गिबोनी**

**निवेदक:** ''ही गोष्ट एका लेवीची आहे. तो, आपला नोकर व नोकरणी ह्यांना घेऊन प्राचीन इस्राएल प्रदेशातून प्रवास करीत होता'' (वाचा शास्ते 19:14-21)

**नोकर:** ''धनी सूर्य तर मावळला आहे. आता पुढे जायला नको इथेच थांबू''

**नोकराणी:** ''आपण ह्या समोरच्या गावात जाऊ आणि झोपण्यापुरती जागा कोठे मिळते का ते पाहू.'' (ते स्टेजवर एका बाजूने चालत जातात आणि दार ठोठावण्याची कृती करतात)

**गिबोनी:**

**लेवी:** ''कृपा करुन आम्हांला झोपण्या पुरती जागा द्या. आम्ही प्रवासास निघालेले प्रवासी आहोत आणि रात्रीच्या निवाऱ्या पुरती जागा आम्हांला हवी आहे. त्यासाठीचे भाडे आम्ही देऊ!''

**गिबोनी:** ''प्रवाशांना मी माझ्या घरात आसरा देणार नाही! जा आणि शहराच्या चौकात जमीनीवर झोपा!''

**निवेदक:** ''त्यांनी अनेक घरांचे दरवाजे ठोठावले पण कोणीही त्यांना रहायला जागा दिली नाही''

**लेवी:** ''चला आजची रात्र त्या उघडया चौकातच काढावी लागणार वाटतं जागे राहून पाहरा द्या. येथे धोका **आहे**'' (ते थोडेसे अंतर चालून जातात आणि सर्वजण खाली बसतात)

**म्हातारा माणूस:** ''शांती असो! तुम्ही कोठे निघालात? येथे असे राहणे धोक्याचे आहे.''

**लेवी:** ''आम्ही एफ्राइमला निघालो आहोत कोणीच आम्हांला रात्रीपुरता निवारा द्यायला तयार नाही तसेच आमच्याकडे गाढवांसाठी पुरेसे दाणावैरण आणि आमच्यासाठी भाकरी व द्राक्षारस नाही.''

**म्हातारा माणूस:** ''चला मी तुमची सर्व व्यवस्था पाहतो. अशी उघडया चौकात रात्र काढू नका. माझ्या घरी चला. तुमच्या गाढवांना दाणावैरण मी देतो.''

**गाढवे:** गाढवांच्या ओरडण्याचा आवाज करा. (सर्वजण जातात.)

**निवेदक:** ''म्हाताऱ्या माणसाने गाढवांच्या पुढे दाणावैरण घातले, प्रवाशांचे पाय धुतले आणि त्यांना जेवायला वाढले.''

नाटक पार पाडण्यास मदत केलेल्या प्रत्येकाचे आभार माना आणि मोठया लोकांनी शांतपणे ऐकून घेतल्याबद्दल त्यांनाही धन्यवाद द्या.

मंडळीच्या पुढाऱ्याच्या मदतीने मुलांना उपासनेत सहभागी होता यावे याकरीता तशी व्यवस्था करा.

- मुलांना म्हाताऱ्या माणसाचे नाटक पौढांसमोर सादर करु द्या.
- या नाटकामध्ये त्यांना देण्याविषयीचे कोणते चांगले उदाहरण पहायला मिळले हे मुलांना प्रौढांना विचारु द्या.
- एखादया मुलाला गरीब विधवे विषयी सांगायचे असेल तर सांगू दया, आणि मग पान क्र. 1 वरील प्रश्न विचारा

**कविता:** मुलांना, स्तोत्र 50:1,9,10,12 व 23 हयांतून एक किंवा अधिक वचने म्हणू द्या.

आपण नाटकात देण्या विषयी कोणते चांगले उदाहरण पाहिले ते मुलांना विचारा. मुलांना उत्तर देऊ द्या. (उत्तर: म्हाताऱ्या माणसाने, अनोळखी लोकांनाही, संतोषाने दिले)

मोठया मुलांना, इतरांना देण्याविषयी कविता, गीत अथवा लहानशी गोष्ट लिहिण्यास सांगा.

**पाठ करा:** लूक 6:38

**प्रार्थना:** ''हे प्रभु, ह्या जगातील सर्व काही तुझेच आहे आणि तू आम्हांला भरपूर दिलेले आहे. आम्ही त्याबद्दल कृतज्ञ आहोत गरीब विधवे प्रमाणे संतोषाने तुला देऊन आम्ही आमची कृतज्ञता दाखवतो. उदारपणे आणि अंत: करणापासून द्यावे याकरीता आमचे सहाय्य कर.''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net